# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जमिन व इमारत करीता मालमत्ता
**{मालमत्ता कर विभाग}** कर निर्धारण व वसूली संबंधी असलेली पूर्णत: Geoenabled असलेली Geocivic System ची देखभाल करणेस्तव उचित एजेन्सीची नियुक्ती होणेबाबत प्रश्न विचारात घेणे.

महाराष्ट्र महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता मालमत्ता कर निर्धारण प मालमत्ता कर रक्कम वसूली करणेचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२७ व १२८ च्या तरतुदी अन्वये नागपूर महानगरपालिकेस आहेत. उक्त प्राप्त अधिकारांतर्गत नागपूर महानगरपालिका सभागृहानी ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५, ठराव क्र.७३ दि.२०/०७/२०१७, ठराव क्र.१५८ दि.३०/१२/२००१ अन्वये निर्णय घेवून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता जी.आय.एस. सर्वेक्षण करून करयोग्य मुल्य निश्चित करणेकरीता इमारत व जमिनीचे longitude & latitude location, मालमत्तेचे क्षेत्रफळ, मालमत्तेचा वापर, मालमत्ता इमारत असल्यास इमारतीचा बांधकामाचा प्रकार, बांधकामाचे वय इत्यादी माहिती प्राप्त करून करयोग्य मुल्य निश्चित वसूलीची प्रक्रिया पूर्णत: Geoenabled करून तर्कसंगत व पारदर्शक प्रणाली राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

परंतू तत्कालीन मा. आयुक्त महोदयांनी फक्त इमारत व जमिनीकरीता वरीलप्रमाणे आवश्यक डाटा जी.आय.एस.च्या माध्यमातून गोळा करण्याचे व गोळा केलेला मंजूर डाटा त्यावेळी अस्तित्वात असलेली e-governance च्या PTIS Module सोबत Intigrate करून मालमत्ता कर निर्धारण व वसूलीची प्रक्रिया Geoenabled नसलेल्या PTIS Module मधून करण्याचे आदेश दिलेले होते. परंतू सदर व्यवस्थमुळे खालील अडचणी येत होत्या.

१.G.I.S. Data गोळा करणेकरीता Geocivic App चे देखभाल व दुरूस्ती करणेकरीत वेगळी एजेन्सी करयोग्य मुल्य निश्चित करून मालमत्ता कर निर्धारण व मालमत्ता कर वसूली करण्याची कार्यवाही e-governance च्या PTIS Module मधून होणेकरीता PTIS Module ची देखभाल व दुरूस्ती करणेकरीत वेगळी एजेन्सी असल्याने मालमत्ता कर निर्धारण व वसूली करीता बराच कालावधी लागत होता. दोन्ही System parallel सुरू राहल्यास प्रत्येक इमारत व जमिनीकरीता G.I.S. Data update होत नव्हता.

२. करयोग्य मुल्य निश्चित करून मालमत्ता कर निर्धारण व वसूली करणेबाबत PTIS Module मधून करण्यात येत असलेली कार्यवाही ही Full-proof नव्हती व Integrity चा अभाव असलेली होती.

३. PTIS Module हे Geofenced नसल्याने अधिकाराचा गैरवापर होत असल्याची शंका निर्माण होत होती.

४. तसेच नागपूर महानगरपालिकेत Property Tax करीता GeoCivic System व PTIS Module System ची देखभाल व दुरुस्ती करीता दोन एजेन्सीला भुगतान करावे लागत होते.

PTIS Module मध्ये अनुभवलेल्या अडचणीमुळे दि.०१/०४/२०२२ पासून नागपूर क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता करयोग्य मुल्य निश्चित करणेकरीता आवश्यक डाटा गोळा करणे, गोळा केलेल्या मंजूर डाटा वरून करयोग्य मुल्य निचित करून मालमत्ता कर निर्धारीत करणे व मालमत्ता कराची वसूली करणेची, मालमत्ता मालकी हक्क हस्तांतरण (नामांतरण) ची कार्यवाही पूर्णत: Geoeabled Geocivic System च्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्यामुळे मालमत्ता कर विभागाची पूर्ण कार्यप्रणाली मध्ये पारदर्शकता आलेली आहे, तसेच प्रत्येक नागरीकांना कोणत्याही मालमत्तेचा काय डाटा आहे? उक्त डाटा वरून काय अपेक्षित मासिक दर निश्चित केलेला आहे? करयोग्य मुल्य काय निश्चित केलेले आहे? निश्चित केलेल्या करयोग्य मुल्यावर कोणता मालमत्ता कर कोणत्या दराने आकारलेला आहे? कोणत्या मालमत्तेकरीता प्रत्येक सहामाही करीता काय मालमत्ता कर आहे? मालमत्ता कर रक्कम मान्य असल्यास ऑन लाईन पद्धतीचा वापर करून मालमत्ता कर नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणेची सुविधा, मालमत्ता कर जमा करण्यात आल्याची Online रशीद प्राप्त करणेची सुविधा, वेळोवेळी जमा केलेल्या मालमत्ता कर रक्कमेच्या रशीद व हिशोब प्राप्त करणेची सुविधा, मालमत्ता कर निर्धारणवर आक्षेप असल्यास आक्षेप नोंदविणेची सुविधा व नविन मालमत्ता निर्माण झालेली असल्यास, मालमत्ता खरेदी केलेली असल्यास नविन निर्माण केलेल्या मालमत्तेचे मालमत्ता कर निर्धारण करून घेणेकरीता व स्वत:चे

नाव मालमत्ता कर निर्धारण पुस्तिकेत नोंदविणेकरीता ऑन लाईन अर्ज सादर करणेची सुविधा Geocivic system च्या माध्यमातून उपलब्ध करून पारदर्शकता आणणेचा प्रयत्न केलेला आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारा आवश्यक Hardware Provide करुन Full-Proof GeoCivic Property Tax Management System ची देखभाल करणेची व नविन निर्माण होणाऱ्या मालमत्तांकरीता, सुटलेल्या मालमत्तांकरीता जी. आय. एस. डाटा गोळा करणेस सहकार्य (Assistance) देणाऱ्या एजेन्सीची नियुक्ती करणेकरीता EOI प्रक्रिया राबविणेस्तव प्रस्तूत आहे. EOI प्रक्रियेकरीता आवश्यक RFP दस्ताऐवज तयार करण्यात आलेले आहे. सदहू कामावर येणारा खर्च विभागाचे अंदाजपत्रकीय पद क्र.A2900062204 (GIS Survey & Scanning) मधून करण्यात यईल.

नवीन EOI होईस्तोवर मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेयर लि. द्वारा सुरु असलेली Full-Proof GeoCivic Property Tax Management System ची देखभाल व दुरुस्तीची कामे जुन्याच दराने मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेयर लि. कडून करुन घेण्याचे तसेच RFP दस्ताऐवजास मान्यता देवून EOI प्रकिया राबवून एजेन्सी नियुक्तीची कार्यवाही करण्याकरीता अनुमती मिळणेचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 360 /मनपा/प्रशासक** **दिनांक :- 09/ 05 /2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्र.उपायुक्त (महसूल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जमिन व इमारत करीता मालमत्ता कर निर्धारण व वसूली संबंधी असलेली पूर्णत: Geoenabled असलेली Geocivic System ची देखभाल करणेस्तव उचित एजेन्सीची नियुक्ती होणेबाबत प्रश्न विचारात घेऊन,

महाराष्ट्र महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता मालमत्ता कर निर्धारण प मालमत्ता कर रक्कम वसूली करणेचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२७ व १२८ च्या तरतुदी अन्वये नागपूर महानगरपालिकेस आहेत. उक्त प्राप्त अधिकारांतर्गत नागपूर महानगरपालिका सभागृहानी ठराव क्र.७२ दि.०४/०३/२०१५, ठराव क्र.७३ दि.२०/०७/२०१७, ठराव क्र.१५८ दि.३०/१२/२००१ अन्वये निर्णय घेवून नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता जी.आय.एस. सर्वेक्षण करून करयोग्य मुल्य निश्चित करणेकरीता इमारत व जमिनीचे longitude & latitude location, मालमत्तेचे क्षेत्रफळ, मालमत्तेचा वापर, मालमत्ता इमारत असल्यास इमारतीचा बांधकामाचा प्रकार, बांधकामाचे वय इत्यादी माहिती प्राप्त करून करयोग्य मुल्य निश्चित वसूलीची प्रक्रिया पूर्णत: Geoenabled करून तर्कसंगत व पारदर्शक प्रणाली राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

परंतू तत्कालीन मा. आयुक्त महोदयांनी फक्त इमारत व जमिनीकरीता वरीलप्रमाणे आवश्यक डाटा जी.आय.एस.च्या माध्यमातून गोळा करण्याचे व गोळा केलेला मंजूर डाटा त्यावेळी अस्तित्वात असलेली e-governance च्या PTIS Module सोबत Intigrate करून मालमत्ता कर निर्धारण व वसूलीची प्रक्रिया Geoenabled नसलेल्या PTIS Module मधून करण्याचे आदेश दिलेले होते. परंतू सदर व्यवस्थमुळे खालील अडचणी येत होत्या.

१.G.I.S. Data गोळा करणेकरीता Geocivic App चे देखभाल व दुरूस्ती करणेकरीत वेगळी एजेन्सी करयोग्य मुल्य निश्चित करून मालमत्ता कर निर्धारण व मालमत्ता कर वसूली करण्याची कार्यवाही e-governance च्या PTIS Module मधून होणेकरीता PTIS Module ची देखभाल व दुरूस्ती करणेकरीत वेगळी एजेन्सी असल्याने मालमत्ता कर निर्धारण व वसूली करीता बराच कालावधी लागत होता. दोन्ही System parallel सुरू राहल्यास प्रत्येक इमारत व जमिनीकरीता G.I.S. Data update होत नव्हता.

२. करयोग्य मुल्य निश्चित करून मालमत्ता कर निर्धारण व वसूली करणेबाबत PTIS Module मधून करण्यात येत असलेली कार्यवाही ही Full-proof नव्हती व Integrity चा अभाव असलेली होती.
३. PTIS Module हे Geofenced नसल्याने अधिकाराचा गैरवापर होत असल्याची शंका निर्माण होत होती.
४. तसेच नागपूर महानगरपालिकेत Property Tax करीता GeoCivic System व PTIS Module System ची देखभाल व दुरुस्ती करीता दोन एजेन्सीला भुगतान करावे लागत होते.

PTIS Module मध्ये अनुभवलेल्या अडचणीमुळे दि.०१/०४/२०२२ पासून नागपूर क्षेत्रातील इमारत व जमिनीकरीता करयोग्य मुल्य निश्चित करणेकरीता आवश्यक डाटा गोळा करणे, गोळा केलेल्या मंजूर डाटा वरून करयोग्य मुल्य निचित करून मालमत्ता कर निर्धारीत करणे व मालमत्ता कराची वसूली करणेची, मालमत्ता मालकी हक्क हस्तांतरण (नामांतरण) ची कार्यवाही पूर्णत: Geoeabled Geocivic System च्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्यामुळे मालमत्ता कर विभागाची पूर्ण कार्यप्रणाली मध्ये पारदर्शकता आलेली आहे, तसेच प्रत्येक नागरीकांना कोणत्याही मालमत्तेचा काय डाटा आहे? उक्त डाटा वरून काय अपेक्षित मासिक दर निश्चित केलेला आहे? करयोग्य मुल्य काय निश्चित केलेले आहे? निश्चित केलेल्या करयोग्य मुल्यावर कोणता मालमत्ता कर कोणत्या दराने आकारलेला आहे? कोणत्या मालमत्तेकरीता प्रत्येक सहामाही करीता काय मालमत्ता कर आहे? मालमत्ता कर रक्कम मान्य असल्यास ऑन लाईन पद्धतीचा वापर करून मालमत्ता कर नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणेची सुविधा, मालमत्ता कर जमा करण्यात आल्याची Online रशीद प्राप्त करणेची सुविधा, वेळोवेळी जमा केलेल्या मालमत्ता कर रक्कमेच्या रशीद व हिशोब प्राप्त करणेची सुविधा, मालमत्ता कर निर्धारणवर आक्षेप असल्यास आक्षेप नोंदविणेची सुविधा व नविन मालमत्ता निर्माण झालेली असल्यास, मालमत्ता खरेदी केलेली असल्यास नविन निर्माण केलेल्या मालमत्तेचे मालमत्ता कर निर्धारण करून घेणेकरीता व स्वत:चे नाव मालमत्ता कर निर्धारण पुस्तिकेत नोंदविणेकरीता ऑन लाईन अर्ज सादर करणेची सुविधा Geocivic system च्या माध्यमातून उपलब्ध करून पारदर्शकता आणणेचा प्रयत्न केलेला आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारा आवश्यक Hardware Provide करुन Full-Proof GeoCivic Property Tax Management System ची देखभाल करणेची व नविन निर्माण होणाऱ्या मालमत्तांकरीता, सुटलेल्या मालमत्तांकरीता जी. आय. एस. डाटा गोळा करणेस सहकार्य (Assistance) देणाऱ्या एजेन्सीची नियुक्ती करणेकरीता EOI प्रक्रिया राबविणेस्तव प्रस्तूत आहे. EOI प्रक्रियेकरीता आवश्यक RFP दस्ताऐवज तयार करण्यात आलेले आहे. सदर्हू कामावर येणारा खर्च विभागाचे अंदाजपत्रकीय पद क्र.A2900062204 (GIS Survey & Scanning) मधून करण्यात यईल.

नवीन EOI होईस्तोवर मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेयर लि. द्वारा सुरु असलेली Full-Proof GeoCivic Property Tax Management System ची देखभाल व दुरुस्तीची कामे जुन्याच दराने मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेयर लि. कडून करुन घेण्याचे तसेच RFP दस्ताऐवजास मान्यता देवून EOI प्रकिया राबवून एजेन्सी नियुक्तीची कार्यवाही करण्याकरीता अनुमती मिळणेचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**